Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849560

# राजकीय पक्षाची संधीसाधू धोरणे व सद्यस्थिती एक आढावा

**डॉ. विश्वास दामोधर तळेकर[1]**

**प्रस्तावना :-**

संसदीय लोकशाही शासन प्रणालीमध्ये राजकीय पक्षांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण राजकीय पक्षाशिवाय लोकशाही शासन प्रणालीचा कल्पना करणे अवघड आहे. भारताने संसदीय संसदीय लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार करून आज प्रदीर्घ कालखंड झाला, तरीही भारतात लोकशाही भक्कमपणे टिकून आहेत. हे केवळ भारतीय संविधानातील मूलभूत तत्वे आणि संविधानिक तरतुदीमुळे शक्य होताना दिसतात. तसेच लोकशाही पद्धतीत राजकीय पक्ष हा महत्त्वाचा घटक असून याशिवाय लोकशाहीची संकल्पना स्पष्ट होत नाही. आपण प्राचीन काळाचा मागोवा घेतला तर असे दिसते की, लहान-लहान नगरांचा विकास व्हावा तसेच तेथील प्रश्न, समस्या, सोडवण्यासाठी चर्चा विचारविनिमय करून एकमताने निर्णय घेण्याची प्रथा रूढ होती. मात्र कालांतराने यात बदल होत गेला, आणि जनतेला भेडसावणाऱ्या समस्यांची, प्रश्नांची आणि अडचणींची सोडवणूक करण्यासाठी प्रतिनिधींच्या माध्यमातून प्रश्न सोडवले जाऊ लागले. आणि हेच प्रतिनिधी विविध राजकीय पक्षांचे सदस्य असतात. अशाच भारतातील राजकीय पक्षांची सध्याची ध्येय, धोरणे आणि त्यांची संधीसाधू भूमिकेचा अभ्यास या संशोधन लेखात करण्यात येणार आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने बहुपक्ष पद्धतीचा अवलंब केला. सध्या भारतात सहा राष्ट्रीय पक्ष असून आपल्या प्रदेशाची प्रादेशिक अस्मिता टिकून राहावीत म्हणून अस्तित्वात आलेले विविध प्रादेशिक पक्ष देशाच्या आणि राज्याच्या राजकारणाच्या परिघामध्ये सक्रिय आहे. देशात स्वातंत्र्यापासून ते सन 1990 पर्यंत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे एक हाती वर्चस्व राहिले आहे. देशातील एक प्रमुख आणि राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत या पक्षाचा मोठा बोलबोला राहिलेला आहे. मात्र भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला मोठी राजकीय उतरती कळा सध्याच्या काळात लागली आहे. कारण या पक्षाची मोठी राजकीय हानी मागील पंधरा वीस वर्षांमध्ये झालेली आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षातून असंख्य नेते बाहेर पडले. परिणामी वैचारिक तडजोडी आणि संधीसाधू धोरण राजकीय पक्षांनी स्वीकारले दिसून येत आहे. या धोरणाचा भारतीय राजकारणात अधिक जोर धरलेला दिसतो आहे.

[1] प्रभारी प्राचार्य, स्व. डॉ. भाऊसाहेब देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, जोमाळा ता. भोकरदन जि. जालना.

**संशोधनाचे उद्दिष्टे:-**

1) भारतातील राजकीय पक्ष पक्ष पद्धती जाणून घेणे.

2) राजकीय पक्षाची ध्येय धोरणांचा अभ्यास करणे.

3) राजकीय पक्षाच्या बदलत्या भूमिकेचे अवलोकन करणे.

**संशोधनाची गृहीतके:-**

1) भारतात राजकीय पक्ष पद्धती खोलवर रुजली आहे.
2) राजकीय पक्षाच्या भूमिका सतत बदलत आहे.
3) राजकीय पक्ष मूळ विचारधारा पासून दूर जात आहे.

4) राजकीय पक्षाची वेगवेगळी विचारधारा आहे.

**संशोधन पद्धती:-**

या संशोधन लेखाकरिता विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला. असून द्वितीय साधनावर आधारित संशोधन लेखाकरिता संबंधित लेखा विषयी प्रकाशित झालेले संदर्भ ग्रंथाचा वापर करण्यात आलेला आहे.

**विषय प्रतिपादन:-**

भारताने अनेक पक्ष पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. त्यामुळे भारतीय राजकारणावर राष्ट्रीय पक्षाबरोबरच विविध प्रादेशिक पक्षांचा प्रभाव पडलेला आहे. बहुपक्ष पद्धतीमध्ये कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळू शकत नाही, परिणामी विविध राजकीय पक्षांना सोबत घेऊन युती किंवा आघाडी सरकार स्थापन करण्याकडे सध्या राजकीय पक्षाचा कल दिसतो आहे. या आघाड्या किंवा युती करीत असताना केवळ सत्तेच्या खुर्ची करिता आपल्या पक्षाची विचारधारा गहाण ठेवून सत्तेत सहभागी होतात. यावेळी पक्ष स्थापने वेळेची रचना, कृती, कार्यपद्धती पक्षाची ध्येय धोरणे यासारख्या विविध तत्वे आणि मूल्यांची राजकीय पायमल्ली होत आहे. म्हणून स्वतःच्या फायद्याकरिता आणि सत्तेकरिता नैतिक मूल्य बाजूला सारले जातात. त्याचा हकनाक त्रास सामान्य जनतेला होत असतो. कारण निवडणुकीपूर्वी जनमताला दिलेली आश्वासने, कार्य करण्याची क्षमता यासारख्या निर्णयावर विरजण पडते. परिणामी जनतेचा भ्रमनिरास होतो. भारतात बहुपक्ष पद्धतीमुळे भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढत आहे. कारण भारतीय राजकारणाचा मागील

काही पंचवार्षिक निवडणुकीचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की, राष्ट्रीय पक्ष म्हणून नावलौकिक आणि राजकारणात प्रबळ व प्रभावी असलेल्या पक्षांना स्वबळावर सत्ता मिळवता आलेली नाही. त्यामुळे प्रादेशिक पक्ष केंद्रीय राजकारणात महत्त्वाची म्हणजेच किंग मेकरची भूमिका बजावत आहे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे सन 2024 मध्ये लोकसभेची 18 वी सार्वत्रिक निवडणूक संपन्न झाली. या निवडणुकीत भाजप प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी मध्ये असंख्य प्रादेशिक पक्ष सहभागी झाले. यात प्रामुख्याने आंध्रप्रदेश मधील तेलगू देशम या प्रादेशिक पक्षाने आणि बिहारमधील जनता दल युनायटेड या प्रादेशिक पक्षाला सत्ता स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावता आली आहे. आणि या दोन्ही पक्षाच्या पाठिंबामुळे एनडीएने केंद्रात तिसऱ्यांदा सत्ता प्राप्त केली.

यापमाणे राज्याच्या राजकारणाचा आपण अभ्यास केला तर असे लक्षात येते की, राष्ट्रीय पक्षांना एकहाती सत्ता मिळवण्यात अपयश आले. परिणामी राज्यातील विविध प्रादेशिक पक्षांना आघाडी किंवा युती स्थापन करून सत्ता स्थापन करावे लागली. त्याचा अनुभव आपल्याला 2014 2019 आणि 2024 च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये आलेला आहे. देशात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष या दोनच पक्षांमध्ये सत्ता स्थापनेसाठी चढाओढ असते. त्यामुळे या पक्षांमध्ये परस्परांवर राजकीय कुरघोडी आणि फोडाफोडीचे राजकारण होताना दिसते. तसेच शह- काटशह देण्याचा प्रयत्न करीत असतात. यामध्ये सध्यातरी भारतीय जनता पक्ष सफल होत असून इतर राजकीय पक्षांना मोठे राजकीय हादरे या पक्षाने दिले आहे. त्यामुळे भिन्नभिन्न विचारसरणी असलेले प्रादेशिक पक्षांनी भाजपसोबत बस्तान मांडले असून सत्तेचे गोड फळे चाखत आहे. म्हणून सध्याच्या राजकीय समीकरणाचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, राजकीय पक्ष हे केवळ सत्ता केंद्रित असतात. आपल्या पक्षाची विचारधारा नैतिकता याला मोठी तिलांजली राजकीय पक्षाकडून मिळताना दिसत आहे.

महाराष्ट्रात सन 2019 ला संपन्न झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांनी संयुक्तिकरित्या निवडणूक लढवली, तसेच काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या समविचारी पक्षांनी देखील आघाडी करून निवडणूक लढवली. या निवडणुकीत महाराष्ट्रीयन जनतेने भाजप आणि शिवसेनेला सत्ता स्थापनेचा कोल दिला. परंतु मुख्यमंत्री पदावरून दोन्ही पक्षामध्ये सत्ता संघर्ष पाहायला मिळाला. परिणामी अनेक आरोप प्रत्यारोपाच्या फेऱ्या झाडल्यानंतर हिंदुत्ववादी मुद्द्यावरून या समचारी पक्षाची पंचवीस वर्षाची युती संपुष्टात आली. आणि शिवसेनेने आपल्या विरोधी विचारसरणी असलेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी या घरोबा करून महाराष्ट्रात नवीन सत्ता समीकरणे तयार केली. आणि राज्यात महाविकास आघाडी सरकार स्थापन केले. आणि या निवडणुकीत भाजपने सर्वाधिक जागा जिंकून सुद्धा विरोधी पक्षात बसावे लागले. यावरून आपल्या लक्षात येते की, राजकारणात सत्तेला खूपच महत्त्व असून सत्तेपेक्षा निष्ठेला महत्त्व

नसते, हे परत एकदा अधोरेखित झाले. म्हणून राजकीय पक्ष हे केवळ सत्तेकरिता हापापलेले असतात. या ठिकाणी "मॅक्सवेवरच्या म्हणण्यानुसार राजकीय पक्ष हे सत्तेच्या गढीवर बसलेले असतात.' हे विधान तंतोतंत लागू होते. कारण तडजोडी, नीतिमत्ता संधीसाधू धोरणे यांचा उपयोग करून राजकीय पक्ष सतत सत्तेत राहता यावेत, म्हणून प्रयत्नशील असतात. यासाठी नवनवे दबावतंत्र वापरून विरोधी पक्षातील नेत्यांना पक्षांतर करण्यासाठी सुद्धा सध्याच्या राजकारणात प्रयत्न होत आहे.

महाराष्ट्रात 2024 मध्ये विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका संपन्न झाल्या ही निवडणूक प्रामुख्याने अखंड शिवसेना आणि अखंड राष्ट्रवादी काँग्रेसची दोन' "शकले" 'पडल्यानंतर ची झालेली पहिलीच विधानसभा निवडणूक होय. या निवडणुकीत देखील भिन्न विचारधारा असलेली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) भाजप आणि एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेना यांनी एकत्रित येऊन निवडणूक लढवली. तर महाविकास आघाडी मध्ये काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी संयुक्तिकरित्या निवडणूक लढवली, यावरून असे दिसते की, सर्वच राजकीय पक्षांनी सत्ता प्राप्तीसाठी आपली मूळ विचारधारा बाजूला सारून भिन्न विचारधारा असलेल्या पक्षासोबत आघाडी केली आणि सत्तेची पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न केला. म्हणून पुन्हा एकदा राजकीय पक्ष हे सत्ता हस्तगत करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात हे सिद्ध झाले. निवडणुका संपन्न झाल्यानंतर संख्याबळाची बेरीज करून सत्तेची मॅजिक गाठून सरकार स्थापन करण्यासाठी राजकीय पक्ष पुढाकार घेतात. राजकीय पक्षांच्या या भूमिकांमुळे देशाच्या आणि राज्याच्या राजकारणात राजकीय पक्षांची विश्वासहर्ता कमी होत आहे असे म्हटले तर वागवे ठरणार नाही.

भारतातील सर्वच घटक राज्यांमधील प्रादेशिक पक्ष त्या- त्या राज्यात मध्ये प्रबळ असून हेच पक्ष केंद्रीय स्तरावरील सत्ताधारी पक्षात सहभागी होतात. त्यांचा सहभाग म्हणजे केवळ सत्तेसाठी असून प्रत्येक पक्षांची वृत्ती केवळ संधीसाधू बनली आहे. राजकीय पक्षांच्या या भूमिकांमुळे राज्याच्या राजकारणात अधून मधून अस्थिरता निर्माण होत आहे. म्हणून जनमताचा अनादर करून सत्ते करिता झालेल्या अभद्र आघाडी आणि युती भारतीय लोकशाहीसाठी धोकादायक ठरते आहे. भारतीय राजकारणातील बदलत असलेल्या सत्ता समीकरणे आणि पक्षांची संधीसाधू धोरणे याचा नकारात्मक परिणाम राजकारणात दिसत असून नीतिमत्तेला आणि निष्ठेला कोणतेही महत्त्व सध्या मिळत नाही. जिकडे सत्ता तिकडे राजकीय पक्ष तडजोड करत आहे. परिणामी राजकीय पक्षांमध्ये विचारधारेची दिवाळीखोरी सध्या तरी राज्याच्या राजकारणात बघायला मिळत आहे.

**समारोप:-**

वरील लेखाचा आढावा घेतला तर असे म्हणता येईल की, भारतीय राजकारणात राजकीय पक्ष हे संधीसाधू भूमिका घेऊन राजकारणाची नीतिमत्ता दूषित करत आहे. हे लोकशाहीच्या विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी घातक आहे. म्हणून राजकीय पक्षांनी नैतिकता, विचारधारा, मूल्य, समाजहीत आणि समाजकारण यांची जाणीव ठेवून राजकारणात ही तत्वे अमलात आणण्याची गरज आहे. अभद्र युती आणि आघाडी करून लोकशाहीची प्रक्रिया टिकून राहू शकत नाही. म्हणून राजकीय पक्षाने राष्ट्रहिताच्या, विकासाच्या, जनकल्याणाच्या योजनांवर समन्वयाची भूमिका घेतली तर जनतेचा राजकीय पक्षावरील विश्वास अधिक घट्ट होईल. परिणामी लोकशाही अधिक सक्षम बनेल. निवडणुका समोर आल्या तर सत्ताधारी पक्षाकडून विविध योजनांची अंमलबजावणी केली जाते. तसेच अनेक सवलती आश्वासने देऊन जनतेची दिशाभूल केली जात असते. महाराष्ट्रातील तत्कालीन सत्तेत विराजमान असलेल्या सरकारने लाडके बहीण योजनेची घोषणा करून महिला मतदारांना आकर्षित केले. परिणामी या योजनेच्या लाभांमुळे महाराष्ट्रात महायुतीला अपेक्षेपेक्षा अधिक संख्याबळ प्राप्त झाले. महायुतीने महाराष्ट्रामध्ये सरकार बनवले. यासारखी आश्वासने देऊन निवडणुका लढवल्या जातात. आणि कालांतराने याच योजनाना नियम आणि अटी लागू करून योजनाना प्रतिबंध केले जाते. म्हणून राजकीय पक्ष हे सत्तेकरीता सतत प्रयत्नशील असतात. आणि आश्वासनाची खैरात मांडत असतात. अशा पद्धतीने आपल्याला राजकीय पक्षाच्या बदलत्या धोरणांचा थोडक्यात आढावा या लेखाच्या निमित्ताने घेण्यात आला आहे.

**संदर्भ ग्रंथसूची:-**

1. https://wwwmyneta.Info.
2. https://enwikipidia.org.
3. डॉ.अशोक नाईकवाडे डॉ.पंडित नलावडे "महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण" प्रकाशन- कैलास पब्लिकेशन औरंगाबाद 2013.
4. डॉ. अलका देशमुख "लोकशाहीचे बदलते स्वरूप आणि निवडणुकांचे राजकारण," (विषय संदर्भ सोळावी लोकसभा निवडणूक 2014) प्रकाशन श्री साईनाथ प्रकाशन नागपूर 2015.
5. डॉ. राजेंद्र शिंगणे "भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह" प्रकाशन क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स नांदेड 2020.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*